नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक २७/०६/२०२६ (शनिवार )

# घरफोडीचा गुन्हा उघड, १ आरोपी अटक, ९० हजार रूपयांचा मुद्देमाल जप्त स्थानिक गुन्हे शाखा नागपूर ग्रामीण यांची कामगिरी

मा. श्री हर्ष ए. पोद्दार, वरीष्ठ पोलीस अधीक्षक नागपुर ग्रामीण जिल्हा,श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्री सागर खर्डे, सहा पोलीस अधीक्षक तथा उपविभागिय पोलीस अधिकारी,सावनेर उपविभाग यांच्या मार्गदर्शनात दिनांक २६/०६/२०२६ रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पथक सावनेर उपविभागात उघड न झालेल्या गुन्हयांचा तपास करीत असतांना स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने सायबर पोलीस स्टेशन, नागपूर ग्रामीण यांच्या सहकार्याने तांत्रिक विश्लेषण, तसेच गोपनीय माहितीच्या आधारे तपास करून घरफोडीचे गुन्हे करणारा सराईत गुन्हेगार **कुंजन उर्फ यश विनोदसिंग परिहार, वय २३ वर्ष, रा. वागदरा इसासनी, हिंगणा रोड, नागपूर** याला दिनांक २६/०६/२०२६ रोजी मोपेड वाहनासह घोराड टप्पा सर्विस रोड येथुन ताब्यात घेतले. नमुद आरोपी याच्याकडे कौशल्यपुर्ण विचारपुस केली असता त्यांनी कळमेश्वर येथे दिनांक २१/०६/२०२६ रोजी दुपारचे ०१.०० वा. ते २.०० वा. चे सुमारास घोराड टप्पा येथील उषाबाई कानडे यांच्या राहते घराचे समोरील दरवाज्याचे कुलुप तोडुन घरात प्रवेश करून चोरी केल्याचे सांगितले. **पोलीस स्टेशन कळमेश्वर अप क्रं ६४३/२०२६ कलम ३३१(१),३०५(अ) भान्यासं हा गुन्हा उघड झाला आहे.**

**पोलीसांनी पंचासमक्ष गुन्हयात वापरलेले सुझुकी बर्गमेन मोपेड वाहन क्र. एम एच—४०/डी बी—०९७७ किंमती ९०,०००/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. आरोपीस अटक करण्यात आली आहे. पुढील तपास कळमेश्वर पोलीस करीत आहेत.**



## एमआयडीसी बोरी पोलीस स्टेशन हद्दीतील ३ सराईत गुन्हेगारांना नागपुर जिल्हयातुन केले हद्दपार

**पोलीस स्टेशन एमआयडीसी बोरी हद्दीतील अवैध दारू व्यवसायात सक्रिय २ आरोपी आणि अंमली पदार्थाच्या गुन्हयातील सराईत १ महीला आरोपी अशा ३ आरोपींना यांना महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ५६ (१) (अ)(ब) अन्वये नागपुर जिल्हयातुन केले हद्दपार केले.**

सराईत गुन्हेगार नामे **१) नितीन जागोजी वानखेडे, वय ४२ वर्षे, रा. टाकळघाट हिंगणा जि. नागपूर आणि २) रामकृष्ण रघूनाथ येरकाडे, वय ५६ वर्षे, रा. बिडगणेशपूर मेन रोड शिवमंदीर जवळ ता. हिगणा जि. नागपूर** यांचे विरूध्द अवैध दारू बाबत तसेच शरीराविरूध्दचे अनेक गंभीर गुन्हे नोंद आहे. **आरोपी क्रं ३) निलु आकाश कारेमोरे, वय ३० वर्षे, रा. गांगापूर झोपडपटटी टाकळघाट त. हिगणा जि. नागपूर** हिचे विरूध्द अवैध दारू

बाबत तसेच एनडीपीएस कायदयान्व्ये अन्वये अनेक गुन्हे नोंद आहे. नमुद तिन्ही आरोपींचे गुन्हेगारी कृत्यांवर नियंत्रण ठेवण्याकरीता पोलीसांनी वेळोवेळी त्यांचे वर कारवाई करून गुन्हे नोंद केले तसेच त्यांचेवर प्रतिबंधक कार्यवाही सुध्दा केली आहे. परंतु आरोपी यांनी आपली गुन्हेगारी गतिविधी निरंतर सुरूच ठेवली. आरोपींच्या गुन्हेगारी कृत्यामुळे परीसरातील अनेकांना दारूचे आणि अंमली पदार्थाचे व्यसन जडले आहे. तसेच त्यांच्या कृत्यामुळे शांततेचा भंग होवुन कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची दाट शक्यता असल्यामुळे नमुद आरोपीचा महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ५६ (१) (अ) (ब) अन्वये हद्दपार करण्याचा प्रस्ताव एमआयडीसी बोरी पोलीसांनी उपविभागिय पोलीस अधिकारी, नागपुर यांच्या मार्फतीने उपविभागिय दंडाधिकारी, नागपुर (ग्रामीण) यांचे कडे पाठविला असता त्यांनी प्रस्ताव मंजुर करून **वर आरोपी क्रं १) आणि २) यांना १ महीन्यांकरीता तसेच आरोपी क्रं ३) हीला ३ महीन्यांकरीता नागपुर शहर आणि नागपुर ग्रामीण येथुन हद्दपार केले आहे.**

**नागपुर ग्रामीण जिल्हा पोलीसांतर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, नमुद आरोपी हे नागपुर ग्रामीण व नागपुर जिल्हा हद्दीत दिसुन आल्यास नजिकच्या पोलीस स्टेशनला तात्काळ माहीती द्यावी.**



**हद्दपार आरोपी नितीन जागोजी वानखेडे**



**हद्दपार आरोपी रामकृष्ण रघूनाथ येरकाडे**

## अवैधरित्या विनापरवाना दारू काढणारे, दारू बाळगुण विक्री करणाऱ्या तसेच सेवन करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध ०८ गुन्हे नोंद

दिनांक २६/०६/२०२६ रोजी दारूबंदी कायदा अंतर्गत विविध पोलीस स्टेशनला पोलीसांनी अवैधरित्या दारू बाळगुन विक्री करणाऱ्यांवर छापा टाकुन देशी दारू, मोहाफुल दारू असा एकुण ६,१००/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला. महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम अन्वये एकुण ०८ गुन्हे दाखल करण्यात आले आहे.

**पोलीस स्टेशन बेला** येथे आरोपी नामे भोजराज धनराज पराते, वय ४६ वर्षे, रा. वार्ड क्र. ०२, बेला ता. उमरेड, जि. नागपुर याचे वर १ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन वडोदा** येथे आरोपी नामे गोपाल मारोती कोयाडवार, वय ४३ वर्षे, ह.मु. गुमथळा, ता. कामठी जि. नागपुर मुळ पत्ता. पारडी, ता. लाखांदुर, जि. भंडारा याचे वर १ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन सावनेर** येथे आरोपी नामे सुधाकर रामाजी धोटे उर्फ ज्ञानेश्वर रामा धूर्वे, वय ४७ वर्ष, रा. परसोंडी केळवद, नांदा गोमूख याचे वर १ गुन्हा नोंद. **पोलीस स्टेशन केळवद** येथे आरोपी नामे श्यामराव देवाजी नारनवरे, वय ४५ वर्षे, रा. ढालगाव खैरी, ता. सावनेर याचे वर १ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन देवलापार** येथे आरोपी नामे धर्मु उदेशी वरठी, वय ५८ वर्ष, रा.

खिडकी, ता. रामटेक याचे वर १ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन रामटेक** येथे महिला आरोपी हिचे वर १ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन भिवापूर** येथे आरोपी नामे १) दिनेश किष्णाजी पारसे, वय ३५ वर्ष, रा. धापेवाडा, ता. कळमेश्वर, जि. नागपुर २) केशव हरीचद घोडेश्वार, वय ५९ वर्ष, रा. पुल्लर, ता. भिवापूर, जि. नागपूर याचे वर प्रत्येकी १ गुन्हा असे २ गुन्हे नोंद,

**नमुद कारवाईत एकुण ५१३० मिली देशी दारू, ३७ लिटर मोहाफुल दारू असा एकुण ६१००/— रूपयांचा मुद्देमाल मिळून आल्याने नाशवंत मुद्देमाल मौक्यावर पंचनामा कार्यवाही करून नष्ट करण्यात आला.**

## नागपुर ग्रामीण जिल्ह्यातील ७९० रेकॉर्डवरील आरोपीतांची घेण्यात आली आरोपी परेड

मा. श्री हर्ष ए. पोद्दार, वरीष्ठ पोलीस अधीक्षक नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनात आज दिनांक २७/०६/२०२६ रोजी नागपुर ग्रामीण जिल्हयातील २३ पोलीस स्टेशनला शरीराविरूध्दचे गुन्हे करणारे, मालमत्ते विरूध्दचे गुन्हे करणारे, महीला व बाल अत्याचार गुन्हेगार ,अवैध दारू, जुगार इतर अवैध धंदयामधील रेकॉर्डवरील आरोपींतांची आरोपी परेड घेण्यात आली आहे. **एकुण ७९० आरोपीतांची आरोपी परेड घेण्यात आली आहे.**

**नागपुर उपविभाग** :— नागपुर उपविभागातील पोलीस स्टेशन बुट्टीबोरी येथे ३४ आरोपी, पोलीस स्टेशन एमआयडीसी बोरी येथे ३० आरोपी आणि पोलीस स्टेशन बेला येथे ३३ आरोपी अशा एकुण ९७ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**उमरेड उपविभाग** :— उमरेड उपविभागातील पोलीस स्टेशन उमरेड येथे ४६ आरोपी , पोलीस स्टेशन कुही येथे ३३ आरोपी आणि पोलीस स्टेशन भिवापुर येथे २७ आणि पोलीस स्टेशन वेलतुर ३० आरोपी पोलीस स्टेशन पाचगाव १४ आरोपी अशा एकुण १५० रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**सावनेर उपविभाग :—** सावनेर उपविभागातील पोलीस स्टेशन सावनेर येथे ६४ आरोपी , पोलीस स्टेशन कळमेश्वर येथे ३७ आरोपी आणि पोलीस स्टेशन खापा येथे २९ आरोपी

आणि पोलीस स्टेशन केळवद येथे ३३ आरोपी अशा एकुण १६३ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**कन्हान उपविभाग** :— कन्हान उपविभागातील पोलीस स्टेशन कन्हान येथे ३४ आरोपी , पोलीस स्टेशन मौदा येथे १९ आरोपी पोलीस स्टेशन वडोदा येथे १४ आरोपी अशा एकुण ६७ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**रामटेक उपविभाग :—** रामटेक उपविभागातील पोलीस स्टेशन रामटेक येथे ४५ आरोपी , पोलीस स्टेशन पारशिवणी येथे ३१ आरोपी, पोलीस स्टेशन अरोली येथे २८ आरोपी आणि पोलीस स्टेशन देवलापार येथे २३ आरोपी अशा एकुण १२७ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**काटोल उपविभाग :—** काटोल उपविभागातील पोलीस स्टेशन काटोल येथे ६० आरोपी, पोलीस स्टेशन कोंढाळी येथे २९ आरोपी आणि पोलीस स्टेशन नरखेड येथे ५९ आरोपी आणि पोलीस स्टेशन जलालखेडा येथे ३८ आरोपी अशा एकुण १८६ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.



मा. पोलीस अधिक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
यांच्या मान्यतेने